गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
Titie code MAHMAR 52037
YASH SIDDHI NEWS


● वर्ष १ ले ● अंक १३० ● गुरुवार ११ मे २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 130 | Date : 11/05/2023 | blow :Thursday | Page 4 | Price 4

## ११ में १८८८ रोजी जोतिराव फुले महात्मा जोतिराव फुले झाले

जनतेने सभा भरवून फुलेंना महात्मा ही पदवी बहाल केली. जनतेने सभा भरवून महात्मा ही पदवी बहाल केलेले एकमेव कृतिशील समाजसुधारक व विचारवंत आहेत.

अज्ञानाच्या अंधकारात अडकलेल्या बहुजन समाजाला ज्ञानाच्या प्रकाशात आणण्यासाठी जीवनभर ज्यांनी कार्य केलं. अस्पृश्यतेच्या विरोधात कृतिशील आंदोलन उभं केलं. स्वतः च्या घरातील पाण्याची विहीर अस्पृश्यांसाठी खुली केली. विधवा पुनर्वीवाह असेल किंवा आंतरजातीय विवाह असतील



असे जाती अंताचे अनेक उपक्रम त्यांनी राबवले. चार भिंती मध्ये बंदिस्त असलेल्या महिलांना मुक्त श्वास घेण्याचा अधिकार दिला. छत्रपती शिवरायांच्या समाधीच्या शोधा बरोबरच पहिली शिवजयंती साजरी करून महाराजांवरती पहिला पोवाडा लिहिला.शेतकऱ्यांची दयनीय अवस्था का झाली हे शेतकऱ्यांचा असूड या पुस्तकातुन दाखवून दिले. १८८२ मध्ये हंटर कमिशन समोर प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात यावं ही मागणी केली अशी मागणी करणारे जोतिराव फुले हे पहिले समाजसुधारक ठरतात. आपल्या साहित्यामध्ये बळीराजाचा, खंडोबाचा, हिरण्यकश्यपु, बुद्ध, तसेच शूरवीर महार जातींचा इतिहास मांडला आहे. संपूर्ण जगाला मानवतेकडे घेऊन जाईल असा सार्वजनिक सत्यधर्म नावाचा ग्रंथ निर्माण केला.फुलेंची प्रेरणा घेऊन अनेक चळवळी, अनेक विचारवंत व समाजसुधारक उदयास आले. जोतिरावांच्या नेतृत्वात भारतातली पहिली कामगार संघटना उभी राहिली. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारे दिन बंधू वृत्तपत्र उभे राहिले. सत्यशोधक समाज स्थापन करून सर्व जाती धर्माच्या लोकांना त्या मध्ये समाविष्ट करून घेतले. अश्या या कृतीशील समाजसुधारकाच्या प्रति आदर म्हणून मुंबई मधील भायखळा येथे असलेल्या रघुनाथ महाराज सभागृहामध्ये मुंबईयेथील जनतेने जोतिराव फुलेंना वयाच्या ६१ व्या वर्षी महात्मा ही पदवी बहाल केली. सदरील समारंभास रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे,रावबहादूर वंडेकर,स्वामी रामय्या अय्यावारू, मोरो विठ्ठल वाळवेकर इत्यादी मातब्बर मंडळी उपस्थित होती.पदवी दान कार्यक्रमानंतर महात्मा फुलेंनी भाषण केलं. जनतेचं प्रेम पाहून फुलेंचं मनभरून आलं. महात्मा फुलेंनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि जोतिराव फुले महात्मा झाले.

**– परमेश्वर बनकर मो.९५०३२८८२८२**

# राज्यातील सत्तासंघर्षावर आज निकाल

नवी दिल्ली : राज्यातील सत्तासंघर्षावर उद्या (गुरुवारी) सर्वोच्च न्यायालयाचे घटनापीठ निकाल देणार आहे. न्यायालयाच्या 'सर्वोच्च' निकालाकडे त्यामुळे अवघ्या महाराष्ट्रासह देशाचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह बंडखोरी करणाऱ्या १६ आमदारांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत घटनापीठ निकाल सुनावणार आहे. अशात हा निकाल ठाकरे गटाच्या बाजूने लागला तर मुख्यमंत्री शिंदे यांचे मुख्यमंत्रिपद जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. गुरुवारी सकाळी ११ वाजता निकाल




सुनावला जाण्याची शक्यता आहे. शिवसेनेतील बंडामुळे निर्माण झालेला घटनात्मक पेच सर्वोच्च न्यायालयात पोहोचला होता आणि यामुळे न्यायालयात उभय बाजूकडून जोरदार वाद-प्रतिवाद झाला होता. खटल्यातील अनेक पैलू घटनात्मक मुद्द्याशी संबंधित असल्याने या सुनावणीकडे देशाचे लक्ष लागले होते. शिंदे गटाकडून ज्येष्ठ वकील हरीश साळवे, नीरज कौल आदींनी युक्तिवाद केला होता. तर, ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल, अभिषेक मनू सिंघवी या दिग्गजांनी बाजू मांडली होती. दुसरीकडे राज्यपालांकडून सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी बाजू मांडली होती. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करीत भाजपच्या मदतीने सत्ता काबीज केली होती. यानंतर लगेचच हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. शिंदे आणि ठाकरे गटाकडून वेगवेगळ्या स्वरूपाच्या याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. ऑगस्ट २०२२ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश एन.व्ही. रमणा यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने हे प्रकरण घटनापीठाकडे सोपवले होते. त्यानंतर सलग सुनावणी होऊन १६ मार्च २०२३ रोजी घटनापीठाने दोन्ही बाजूचे युक्तिवाद ऐकून घेत निकाल राखून ठेवला होता. या पार्श्वभूमीवर गुरुवारी घटनापीठ निकाल देणार आहे.

घटनापीठातील एक न्यायमूर्ती एम.आर. शाह हे येत्या १५ मे रोजी सेवानिवृत्त होत असल्यामुळे तत्पूर्वीच निकाल लागेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. अपेक्षेनुसार ११ मे रोजी हा निकाल जाहीर केला जाणार आहे.

राज्याच्या सत्ताकारणाला कलाटणी देणारे हे प्रकरण असल्यामुळे त्याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. घटनापीठात पाच न्यायमूर्ती असून त्यात सरन्यायाधीश धनंजय यशवंत चंद्रचूड यांच्यासह न्यायमूर्ती एम.आर. शाह, न्यायमूर्ती हिमा कोहली, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी आणि न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा यांचा समावेश आहे.

## तीन एक्झिट पोलमध्ये कर्नाटकमध्ये त्रिशंकू विधानसभा; काँग्रेस सर्वात मोठा पक्ष



कर्नाटकः कर्नाटक विधानसभा निवडणुकीचे एक्झिट पोल येण्यास सुरुवात झाली आहे. कर्नाटकमध्ये त्रिशंकू विधानसभेचा अंदाज एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. काँग्रेस या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे एच.डी. देवेगौडा यांचा जनता दल धर्मनिरपेक्ष किंगमेकर ठरणार असल्याचे म्हटले जात आहे. कर्नाटकमध्ये आज मतदान पार पडल्यानंतर विविध संस्थांचे एक्झिट पोल जाहीर करण्यात आले आहे.

न्यूज नेशन-सीजीएस एक्झिट पोलनुसार, भाजप ११४ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवू शकते. तर, काँग्रेसला ८६ आणि जेडीएसला २१ जागा मिळण्याची शक्यता आहे. तीन जागा इतर पक्षांच्या किंवा अपक्षांच्या खात्यात जाऊ शकतात.

रिपब्लिक टीव्ही-पी मार्क्यू एक्झिट पोलनुसार, कर्नाटकमध्ये त्रिशंकू विधानसभा होऊ शकते. येथे भाजपला ८५-१०० जागा मिळतील, तर काँग्रेसला ९४-१०८ जागा मिळतील. जेडीएसला २४-३२ जागा मिळू शकतात आणि इतरांना २-६ जागा मिळू शकतात.

न्यूज नेशन-सीजीएस एक्झिट पोलनुसार, भाजप ११४ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवू शकते. तर, काँग्रेसला ८६ आणि जेडीएसला २१ जागा मिळण्याची शक्यता आहे. तीन जागा इतर पक्षांच्या किंवा अपक्षांच्या खात्यात जाऊ शकतात.

रिपब्लिक टीव्ही-पी मार्क्यू एक्झिट पोलनुसार, कर्नाटकमध्ये त्रिशंकू विधानसभा होऊ शकते. येथे भाजपला ८५-१०० जागा। **पान २ वर**

## यंदाही ११ वी प्रवेशासाठी उशीर; जून महिन्यात सुरू होणार प्रक्रिया

मुंबई : राज्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही पाच लाखापेक्षा अधिक विद्यार्थी अकरावी प्रवेश मिळावा म्हणून धडपड करीत आहेत. या शैक्षणिक वर्षामध्ये जून पासून ऑनलाइन अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू होईल. मागील वर्षी अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेला उशीर झाला होता. २०२३ या शैक्षणिक वर्षात देखील अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेला उशिरा सुरुवात होणार आहे. जून महिन्यात म्हणजे दहावीच्या निकालानंतरच ही प्रक्रिया सुरू होईल.

ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू?: यंदा दहावीचा वार्षिक निकाल अजून घोषित झालेला नाही. परिणामी तो निकाल घोषित झाल्याखेरीज अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू होण्याची चिन्हे दिसणार नाहीत. ही प्रक्रिया १ जूनपासून सुरू होईल. राज्याचे शिक्षण संचालनालयाने वेळापत्रकामध्ये एक जून २०२३ पासून दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करता येणार आहे, असे म्हटले आहे.

हेल्पलाइन आणि मदत कक्ष स्थापन : अकरावी प्रवेशनाच्या अनेक फेऱ्या पार पडतात. अनेकवेळा विद्यार्थ्यांना तांत्रिक कारण समजत नाही. यासंदर्भात आता राज्य आणि शिक्षण संचालनालय यांनी २२ मे रोजी हेल्पलाइन सुरू करण्यात सुनिश्चित केले आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना ऑनलाइन याद्वारे माहिती आणि मदत केली जाईल.। **पान २ वर**

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना ईडीची नोटीस

### सोमवारी चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश

मुंबई : राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना ईडीकडून नोटीस पाठवण्यात आली आहे. सोमवारी चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश नोटीशीतून देण्यात आले आहेत. आयएल आणि एफएस प्रकरणी जयंत पाटलांना नोटीस



धाडल्याची माहिती मिळत आहे. आज सत्तासंघर्षाचा निकाल सर्वोच्च न्यायालय देणार आहे. अशातच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना आलेली ईडीची नोटीस यावरुन राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर आज निकाल येणार आहे, आणि त्याच्या काही तास आधी जयंत पाटील यांना नोटीस मिळते, हा योगायोग समजायचा की आणखी काय,हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे.

आयएल आणि एफएस या कंपनीच्या व्यवहारांची ईडीकडून चौकशी । **पान २ वर**

## गोड साखरेला महागाईची कडवट चव? उत्पादनात घट होण्याचा अंदाज

मुंबई : महागाईने हैराण असलेल्या नागरिकांना आणखी धक्का बसण्याची शक्यता आहे. येत्या काही महिन्यात गोड साखरेला महागाईची कडवट चव येण्याची शक्यता आहे. साखरेचे उत्पादन घटणार



असल्याने तसा अंदाज व्यक्त केला जात आहे. नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपेरिटव्ह शुगर फेडरेशनने सध्या सुरू असलेल्या आर्थिक वर्षातील २०२२-२३ मध्ये साखर उत्पादनात घट होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. सप्टेंबर अखरेच्या तिमाहीपर्यंत ३.२७ कोटी टन उत्पादन होण्याचा अंदाज आहे. याआधी ३.५५ कोटी टन उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.

चालू हंगामात २०२१-२२ च्या तुलनेत साखरेचे उत्पादन ९ टक्क्यांनी कमी राहण्याचा अंदाज आहे. २०२१-२२ मध्ये ३.५९ कोटी टन साखरेचे उत्पादन झाले. छक्रऊडक्रनुसार, देशभरातील सुमारे ५३१ साखर कारखान्यांनी ३० एप्रिलपर्यंत ३२.०३ दशलक्ष टन साखरेचे उत्पादन केले आहे. ५३१ साखर कारखान्यांपैकी ६७ कारखाने अद्याप सुरू आहेत. एनएफसीएसएफचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर म्हणाले की, सध्याचा गाळपाचा वेग पाहता देशातील साखरेचा हंगाम मे अखेरपर्यंत सुरू राहणार असून सुमारे ३२.७ । **पान २ वर**

## सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जनता मान्य करेल : राहुल नार्वेकर

पुणे : राज्यातील सत्ता संघर्षावर उद्या सर्वोच्च न्यायालयात निकाल लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचा काय निकाल लागणार आहे याबाबत सगळीकडे उत्सुकता लागली आहे. याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. अशातच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी याबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांना राज्यातील सत्तासंघर्षाच्या निकालाबाबत विचारले असता ते म्हणाले की उद्या सर्वोच्च न्यायालय जो निर्णय देईल त्या निकालाचा सन्मान जनता करेल. आपण संविधान मानणारे आहोत. माझी जबाबदारी ही केवळ या निमित्ताने महत्वाची ठरत नाही. तर मी अध्यक्षपद स्वीकारले तेव्हापासून जबाबदारीने काम करत आलो आहे असे यावेळी नार्वेकर म्हणाले. ते आज भारती विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यात आले होते.


भारती विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन : भारती विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन दिन समारंभ कार्यक्रम भारती विद्यापीठ संकुल येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे देखील उपस्थित होते. यावेळी । **पान २ वर**

## खुर्चीसाठी आमदारांची धावपळ, सत्ता संघर्षाच्या निकालाशी सामान्य जनतेला देण घेणं नाही : संभाजीराजे

मुंबई : राज्याच्या सत्ता संघर्ष प्रकरणी लागणाऱ्या निकालाशी सर्वसामान्य जनतेला काहीही घेणं देणं नाही. खुर्ची टिकवण्यासाठी आमदारांची धावपळ सुरु असल्याचे वक्तव्य स्वराज्य संघटनेचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती यांनी केलं. राजकारणाचा हा पोरखेळ अनेक वर्षापासून सुरू आहे. लोक त्याला कंटाळले असल्याचे संभाजीराजे छत्रपती म्हणाले. ते नांदेड जिल्ह्यातील तामसा इथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सध्या खुर्ची टिकवण्यासाटी आमदारांची धावपळ सुरु आहे. आज लागणाऱ्या सत्ता संघर्षाच्या निकालाबाबत सर्वसामान्य जनतेला काही देणघेण नसल्याचे संभाजीराजे म्हणाले. सध्या शेतकऱ्यांची बिकट आवस्था आहे. त्याकडे लक्ष देणं गरजेचं असल्याचे संभाजीराजे म्हणाले. आमचं म्हणणं एवढच आहे की तुम्ही विकासावर बोला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी चांगल्या योजना कशी आणाल यावर चर्चा करा, असे संभाजीराजे म्हणाले. राजकारणात सध्या पोरखेळ सुरु आहे. महाराष्ट्र हा सुसंस्कृत राहिला नसल्याचे संभाजीराजे म्हणाले. बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा फैसला अवघ्या काही तासांवर आला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी काल (१० मे) एका प्रकरणाची सुनावणी करत असतानाच ११ मे रोजी दोन महत्वाच्या प्रकरणांवर घटनापीठ निकाल देणार असल्याचे सांगितले. त्यामुळं सर्वच जणांचे लक्ष आजच्या या निकालाकडे लागलं आहे. देशाच्या राजकीय इतिहासातील सर्वात किचकट प्रकरण असलेल्या निकालाचे सर्वोच्च न्यायालय कोणत्या पद्धतीने विश्लेषण करणार? याकडे फक्त राज्यच नव्हे तर संपूर्ण देशाचे लक्ष आहे.

## रायगडावरील २ जूनच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचे सूक्ष्म नियोजन करावे :ह्न सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज ही आपली अस्मिता आहे, प्रत्येक मराठी माणसाचा श्वास आहे. येणारे वर्ष शिवराज्याभिषेक सोहळ्याचे ३५० वे वर्ष आहे. यानिमित्त २ जून रोजी रायगडावर राज्य सरकारकडून आयोजित कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे. संपूर्ण जगातील लोक या सोहळ्याकडे कुतुहलाने बघत असून राज्य शासन करत असलेल्या तयारीत शिवप्रेमींना सोबत घेऊन हा सोहळा भव्यदिव्य आणि देखणा व्हावा यासाठी शिस्तबद्ध तयारी करावी, अशा सूचना राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज अधिकाऱ्यांना दिल्या.




मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आज शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या तयारीबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला आमदार भारत गोगावले, महेंद्र थोरवे, गोपीचंद पडळकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, चित्रपट महामंडळाचे व्यवस्थपकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे, उपसचिव विलास थोरात, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती, रायगडचे अध्यक्ष सुनील पवार यांच्यासह रायगडावर दरवर्षी हा सोहळा आयोजित करणारे शिवप्रेमी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्री. मुनगंटीवार म्हणाले की, कार्यक्रमाच्या संदर्भात एका समितीची स्थापना करण्यात यावी या समितीमध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक कार्य विभागाचे अधिकारी, पर्यटन विभागाचे अधिकारी, पोलीस विभागाचे अधिकारी, । **पान २ वर**

**✻ सुविचार ✻**

चांगला वक्ता हा जातिवंत वीर असतो.

## संपादकीय

# मणिपूरमधील हिंसाचार

हिंसाचारामुळे दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले गेले आहेत. मैतेई समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीला विरोध करत, नागा व कुकी आदिवासींनी आदिवासी एकता मोर्चा काढला होता. त्यानंतर मोर्चेकरी आणि मैतेई लोकांमध्ये झटापट झाली. हिंसाचारामुळे इतकी बिकट अवस्था झाली की हजारो लोकांना इम्फाळ खोऱ्यात तात्पुरत्या शिबिरांमध्ये आश्रय द्यावा लागला. लष्कर आणि आसाम रायफल्सच्या ५५ तुकड्या तैनात कराव्या लागल्या. राज्याच्या लोकसंख्येत ५३ टक्के प्रमाण असलेल्या मैतेई या बिगर आदिवासी समाजाने अनुसूचित जमातीचा दर्जा मिळावा, अशी मागणी केली आहे. याबाबत केंद्र सरकारला चार आठवड्यात शिफारस पाठवावी, असे आदेश मणिपूर उच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात राज्य सरकारला दिले होते. या मागणीला विरोध करत, ऑल ट्रायबल्स स्टुडंट युनियन मणिपूर या विद्यार्थी संघटनेने राज्यातील दहा पर्वतीय जिल्ह्यांमध्ये मोर्चाचे आयोजन केले होते. तेथे मैतेई समुदायाने त्यांच्यावर सशस्त्र हल्ला केला. त्यानंतर मोर्चेकऱ्यांनीही प्रतिहल्ला केला. इम्फाळ खोऱ्यात मैतेई समाज बहुसंख्येत आहे. म्यानमार तसेच बांगलादेशातून होणाऱ्या प्रचंड घुसखोरीचा त्यांना त्रास होतो. त्याउलट पर्वतीय प्रदेशात राहणाऱ्या नागा व कुकी समाजाला विविध कायद्यांचे संरक्षण असल्यामुळे, त्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करता येत नाही. घुसखोरीचा जाच त्यांना होत नाही. मणिपूरचा ९० टक्के भाग हा पर्वतप्राय किंवा टेकड्यांचा आहे. तर बाहेरील नागरिकांनी आमच्या वडिलोपार्जित जमिनींवर ताबा घेतला असून अनुसूचित जमातीत समावेश केल्यास आमचे संरक्षण होईल, असे मैतेई समाजाचे म्हणणे आहे. विद्यमान कायद्यानुसार टेकडी भागात त्यांना कायमचे वास्तव्य करता येत नाही. शिवाय अनुसूचित जमातीत समाविष्ट केले गेल्यास, नोकऱ्यांमध्येही आरक्षण मिळेल. उलट मैतेईंना हा दर्जा दिल्यास आपल्या अधिकारांवर गदा येईल, असे नागा व कुकींना वाटत आहे. जेव्हा स्थानिक भाषा, अस्मिता व संस्कृतीवर आपापली धोरणे लादण्याचा प्रयत्न होतो, तेव्हा त्याविरुध्द प्रतिक्रिया उमटतेच. एक देश, एक धर्म, एक विचार, एक संस्कृती हे धोरण देशात लागू करणे धोकादायक ठरू शकते. सर्वसमावेशक धोरणच विविधतापूर्ण अशा भारतास एका सूत्रात बांधून ठेवू शकते, याचे भान केंद्रातील राज्यकर्त्यांनीही ठेवले पाहिजे आणि तशा प्रकारच्या सूचना मणिपुरातील मुख्यमंत्र्यांनाही द्यायला हव्यात.

# वाचनवेडा: पुस्तकाची किंमत किती ?

**कशाला वाचायचं पुस्तक? उगाच पुस्तकावर कशाला पैसे खर्च करायचे? वाचता येईल कोणाकडून तरी.नाही वाचली पुस्तकं तर काय फरक पडतो ? अवांतर पुस्तकं खरेदी करणे म्हणजे फालतू खर्च.या पुस्तकाची किंमत किती ?'**

अलीकडेच फेसबुकवर एक व्हीडिओ मी पाहिला. त्यात एक पस्तीस किंवा चाळीशीतील पुरूष आपल्या आईवडिलांना बाईकवर घेऊन येतो.रस्त्यावर बाईक थांबवतो.म्हाताऱ्या आईवडिलांना बाईकवरून उतरायला सांगतो.ते उतरल्यावर तो त्यांच्या कापडाची बॅग व एक बोचकं सडकेच्या कडेला फेकतो.बाईकला कीक मारतो आणि मागे वळून न बघताच निघून जातो.हे असं का घडलं असेल ? काल परवाचीच गोष्ट.चेन्नईच्या आय आय टी मध्ये शिकणारा एक अभ्यासू तरूण आत्महत्या करतो.असं का घडत असावं ? नोकरदार झालेली मुलं ना आईवडिलांशी प्रामाणिक राहात, ना पत्नीशी.अर्थात सर्वच तसे नसतात.कुठेतरी नुकतंच लग्न झालेल्या मुली प्रियकरासोबत सहज पळून जातात.मग कोर्टाच्या फेऱ्या.आयुष्याची अनेक वर्षे पुन्हा वाया.मानसिक ताण,विमनस्कता, नैराश्य. असं का घडत असावं ? किंवा या उलटही घडत असतं.

सामान्यतः पालक मुलांच्या शिक्षणासाठी खूप खर्च करतात.करायलाही पाहिजे.परंतु कोणत्या गोष्टींवर ?शाळेची (कॉन्वेंटची)फीस,शाळेची बॅग,शाळेत अभ्यासक्रमाची पुस्तकं,मुलांना खेळायला भारी किंमतीची खेळणी,महागडी सायकल,पुढे बाईक आणि पुढे पुढे महागडा स्मार्टफोन.मुलांना खुश करण्यासाठी किंवा लोकांना दिखाव्यासाठी.तरी सर्व लक्ष असतं विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर.गुणपत्रिका उत्तम तर मम्मी पप्पा खुश.

पूर्वी आईवडिल मुलांची गुणपत्रिका बघत नसत तर वर्तनपत्रिका बघत असत.असं सगळं महागड्या वस्तुंचं जग मुलांच्या हातात दिल्या जातं परंतु अवांतर वाचनासाठी गोष्टींची किंवा अन्य पुस्तकं कधीच घेऊन देत नाही आणि स्वतःही वाचत नाही.कारण तो म्हणजे फालतू खर्च अशी सामान्यतः लोकांची धारणा असते.

मी खूप वर्षे पॅसेंजर ट्रेनने प्रवास केला.ट्रेनमध्ये समोसा,आलूबोंडा,भेल,मुंगफली विक्रेते येत असत. तसेच जनरल नॉलेजची पुस्तकं विकणारी मुलंही यायची.

लोकं दहा रूपयांचा सिंगल वडा सहज विकत घ्यायचे परंतु दहा रूपयांचं पुस्तक विकत घेत नसत.पुढे तो व्यवसाय न चालल्याने त्याच मुलांनी खर्रा विकणं सुरू केलं.तो वीस किंवा तीस रूपयांचा खर्रा अगदी आनंदाने विकत घेत असत.परंतु दहा रूपयांचं गोष्टींचं किंवा सामान्य ज्ञानाचं पुस्तक विकत घेत नसत.काही लोकांना वाटतं की कशाला पुस्तक विकत घ्यावं ? कधी मिळालंच फुकट तर वाचू.नाहीच वाचलं तर काय फरक पडतं ? काय फरक पडतो ते मी पुढे सांगणारच आहे.

तर एकदाची गोष्ट.आम्ही एका हॉटेलमध्ये जेवायला गेलो होतो.अनेक मित्र होते.उच्चशिक्षीत व चांगलं उत्पन्न कमावणारे.जेवणानंतर आलेलं बील बऱ्यापैकी होतं.जवळपास सहा हजार.मी ते दिलं.परंतु पानांचा विडा घ्यायला गेलो तेव्हा एकाने प्रत्येक विड्याचे तीस रूपये प्रमाणे १८० रूपये सहज, स्वेच्छेने व आनंदाने दिले.परंतु त्याला एकदा तीस रूपये किंमतीचं एक गोष्टींचं पुस्तक घ्यायला सांगितलं.तेव्हा तो म्हणाला की,आता कोण वाचतं पुस्तकं? बायकोलाही वाचायला वेळ मिळत नाही आणि मुलांना शाळेचा अभ्यास असतोच. तेव्हा मला लक्षात आलं की त्यांच्या दृष्टीकोणातून तीस रूपये किमतीचा खाऊन थुंकण्याचा विडा किंवा खर्रा हा तीस रूपयांच्या पुस्तकापेक्षा मूल्यवान असतो.असो.या जगात असा विचार करणारा तो एकटाच नाही.

माझं मत असं आहे की मुलामुलींचा केवळ बुद्ध्यांक वाढून उपयोगाचं नाही. आईवडिलांचाही केवळ बुद्ध्यांक वाढणे आवश्यक नाही तर त्यांचा भावनांकही वाढला पाहिजे. त्याचा बुद्ध्यांक त्याचे उत्पन्न ठरवू शकतो परंतु त्याचं तुमच्याशी,आसपासच्या लोकांशी,नातेवाईकांशी एकूण वागणं कसं आहे ते भावनांक ठरवतं.अलीकडच्या आईवडिलांचं लक्ष उच्च खर्चाच्या शाळा व मुलांना देण्यात येणाऱ्या महागड्या वस्तू यांच्याकडेच असतं.वस्तूंनी मुलांना मिळणारा आनंद क्षणिक असतो.हे ज्या पालकांना कळत नाही त्यांना त्याची किंमत तात्काळ मोजावी लागत नाही परंतु ते जेव्हा तरूण होतात, जेव्हा विवाहित होऊन स्वतःचे संसार थाटतात तेव्हा ती मोजावीच लागते.मग वाट्याला येतं नैराश्य.तेव्हाही पुस्तकांचा आधार घेत नाही. मी आता काय करू ?



असे खूप प्रश्न पडतात, परंतु या प्रश्नाचं उत्तर त्यांना सापडत नाही. तेव्हा ते लबाड बाबा अम्मांकडे वळतात. परंतु पुस्तकांकडे नाही.

आपण भारतीय असाल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव ऐकलेच असेल.त्यांना मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल एक पुस्तक बक्षीस मिळालं होतं.ते कृष्णराव केळुसकर या लेखकाने लिहिलेलं.ते होतं बुद्धचरित्र.ते पुस्तक जेव्हा केळुसकरांनी लिहिलं होतं त्या काळात बुद्धावरील पुस्तकं देशात दुर्मिळ होती.ते पुस्तक त्या लहान भिमरावाच्या मनावर एवढा प्रभाव पाडून गेलं की त्यांनी पुढे आपल्या लाखो अनुयायांसह बुद्ध धम्म स्वीकारला आणि या देशाचा इतिहासच बदलला.

मातीत गाडल्या गेलेला बुद्ध घराघरात आला.एवढे परिवर्तन एका पुस्तकाने केले.आता तुम्हाला वाटेल की आपण आता केळुसकरांचं पुस्तक वाचूया म्हणजे झालं.आता माझा तुम्हाला प्रश्न आहे की त्या पुस्तकाची किंमत किती ? हे पुस्तक तर अभ्यासक्रमाचं पुस्तक नव्हतं.

आपणास छत्रपती शिवाजी महाराजाचा इतिहास, त्यांची गनिमी काव्याची पद्धत माहीत असावी.ही पद्धत पुस्तकांच्या माध्यमातून जगभर गेली.नेताजी सुभाषचंद्र बोसांना जेव्हा इंग्रजांच्या नजरकैदेतून निसटून जर्मनीला जायचं होतं तेव्हा 'आग्ऱ्याहून सुटका' ही गोष्ट त्यांच्यासाठी प्रेरणा देणारी ठरली.त्या पुस्तकाची किंमत किती ?

आपल्या पूर्वेला व्हिएतनाम नावाचा एक देश आहे. त्या देशावर अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाने हल्ला केला होता.परंतु त्या देशातील सामान्यातला सामान्य माणूस छत्रपती शिवरायांच्या मावळ्यांसारखा लढला.जसा शिवाजी महाराजांविरूद्ध लढताना बलाढ्य शक्तीशाली औरंगजेब थकला तसाच व्हिएतनामशी लढताना अमेरिका थकली.माघार घेतली. त्या पुस्तकाची किंमत किती ? चांगली पुस्तकं माणसं घडवतात.देशही घडवतात. परंतु ती केवळ अभ्यासक्रमाची नाही.

आपण अलेक्झांडर कनिंघमबद्दल ऐकले किंवा वाचले आहे का ? तो ब्रिटीश अधिकारी भारतामध्ये पुरातत्व संशोधक होता. त्याने महान चिनी प्रवासी 'ह्यू एन त्संग' याचं पुस्तक वाचलं आणि ते वाचून धरतीच्या पोटात दडवलेला बुद्धाचा अख्खा इतिहास धरतीच्या पोटातून बाहेर आणला.असे लोक आणि अशी शेकडो पुस्तकं आहेत की ज्यांनी जगाचा इतिहास बदलला.कार्ल मार्क्सच्या 'दास कॅपिटल' या ग्रंथाने अर्ध्या जगाचा इतिहास बदलला.

जगात अनेक कथा,कविता आणि कादंबऱ्या आहेत की ज्यांनी माणसाच्या मनावर हजारो वर्षे संस्कार केले आणि माणसाला माणूस ठेवले. किमान मशीन होण्यापासून वाचवले.कथा कादंबऱ्यांची पुस्तकं माणसाला केवळ ज्ञान देत नाही तर जगण्याचं शहाणपण देतात.संकटप्रसंगी तोंड कसं द्यावं हे गोष्टींची पुस्तकं शिकवतात.पूर्वी पुस्तकं नव्हती तेव्हा घरातील ज्येष्ठ माणसं कठीण परिस्थितीला सामोरं कसं जावं,आपल्या अवतीभवतीची माणसं कशी मूल्यवान असतात हे शिकवायचे.अलीकडे अशा गोष्टी सांगणारे आजी आजोबा नाहीत.किमान ते 'हम दो हमारे दो'च्या घरात नाहीत.तसे संस्कार करणारी घरं आज नाहीत.मुलांवर घरात संस्कार होत नाही आणि बाहेरही होत नाही.गोष्टींची पुस्तकं न वाचणारी उच्चशिक्षित पिढी माणुसकीने वागताना दिसत नाहीत.अलीकडे तर 'अभ्यास कर... अभ्यास कर... होमवर्क कर...९९टक्के मिळव' असा तगादा लावणारे आईबाप दिसतात.ते अभ्यासक्रमाचं शिकतात व शिकवतात.अशा अभ्यासाने मुलांचा बुद्ध्यांक वाढत असेल परंतु भावनांक वाढत नाही.त्यातून संसार मोडतात,घरं तुटतात,थोड्याशा धक्क्यानेही आजची तरूण पिढी आत्महत्येपर्यंत पोहचते.पुस्तकं या मनोबल वाढवणाऱ्या संस्कार शाळा असतात. सर्वस्व गमावणाऱ्यांनाही पुस्तकांची किंमत कळत नाही.खरं म्हणजे चांगल्या पुस्तकांचं मूल्य कोणीच देऊ शकत नाही.तरी लोक प्रश्न विचारतातच 'या पुस्तकाची किंमत किती?' नाही उत्तर देता येत मला.

मी हजारो पुस्तकं वाचलीत.केव्हातरी एक लहानशी गोष्ट वाचली होती.ती होती ध्रुव बाळाची.ध्रुव म्हणतो की 'मला असं मला अढळ सिंहासन दे की जिथून मला कोणीच हलवू शकणार नाही.' जिथून मला कुणी हटवू शकत नाही असं काहीतरी मी मिळवलेलं आहे.तो मिळवण्याचा ध्यास आहे.ती लहानपणी वाचलेली कथा आजही माझं मानसिक बळ वाढवते.

आपल्या पृथ्वीच्या उत्तरेला एक तारा आहे.त्याला ध्रुव तारा म्हणतात.पृथ्वी आपल्या अक्षाभोवती फिरते.तेव्हा चंद्र, सूर्य आणि ग्रह आपले स्थान बदलतात; परंतु ध्रुव अढळ असतो.कोणतं पुस्तक कोणत्या माणसाचं आयुष्य केव्हा बदलून टाकेल हे सांगता येत नाही.पुस्तकं जगायला शिकवतात,माणुसकीनं वागायला शिकवतात आणि एवढेच नव्हे तर कठीण प्रसंगी खंबीरपणे उभे राहायला शिकवतात.मुलांना अवांतर पुस्तकं वाचायला द्यायची की नाही हे तुम्हीच ठरवा.

**डॉ.विद्याधर बन्सोड**
**प्रोफेसर तसेच मराठी विभागप्रमुख**
**सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर.**

पान १ वरुन

## तीन एक्झिट पोलमध्ये कर्नाटकमध्ये..

मिळतील, तर काँग्रेसला ९४-१०८ जागा मिळतील. जेडीएसला २४-३२ जागा मिळू शकतात आणि इतरांना २-६ जागा मिळू शकतात.

सुवर्ण न्यूज-जन की बात एक्झिट पोलनुसार, भाजपला ९४-११७ जागा मिळू शकतात, तर काँग्रेसला ९१-१०६ जागा मिळू शकतात. जेडीएसला १४-२४ जागा मिळतील आणि इतरांना ०-२ जागा मिळू शकतात.

टीव्ही ९ भारतवर्ष-पोलस्ट्रेट एक्झिट पोलनुसार, भाजपला ८८-९८ जागा मिळू शकतात, तर काँग्रेसला ९९-१०९ जागा मिळू शकतात. बहुमतापेक्षा हा आकडा कमी आहे. या एक्झिट पोलमध्ये जेडीएसला २१-२६ जागा मिळण्याची अपेक्षा आहे, तर इतरांना ०-४ जागा मिळू शकतात.

टाइम्स नाऊच्या एक्झिट पोलनुसार, भाजपला ७८.-९२ जागा, काँग्रेसला १०६-१२० जागा मिळण्याची शक्यता आहे. तर, जेडीएसला २०-२६ आणि इतर पक्षांना २-४ जागा मिळण्याची शक्यता आहे.

झी न्यूज मॅट्रिज एजन्सीच्या एक्झिट पोलनुसार, भाजप ७९-९४ जागा जिंकू शकतो, तर काँग्रेस १०३-११८ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष बनू शकतो किंवा बहुमत मिळवू शकतो. जेडीएसला २५-३३ जागा मिळू शकतात आणि इतर आणि अपक्ष २-५ जागा जिंकू शकतात.

इंडिया टुडे-ॲक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार, भाजपला ६२ ते ८० जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर, काँग्रेसला १२२ ते १४० जागांवर विजय मिळू शकतो. जेडीएसला २० ते २५ जागा मिळू शकतात, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## यंदाही ११ वी प्रवेशासाठी

तसेच १५ मे पासून प्रत्यक्ष मदत केंद्र देखील आपण केले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना मदत केंद्रामध्ये जाऊन ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भातल्या अडचणी सोडवण्यासाठी मदत होईल. अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठी दरवर्षी कनिष्ठ महाविद्यालयांना नोंदणी करावी लागते.

ही नोंदणी १५ मे पासून होणार आहे. त्या दिवसापासून कनिष्ठ महाविद्यालयाने त्याबाबत संचलनालयाकडे नोंदणी करायची असते. नोंदणीसाठी कोणते कनिष्ठ महाविद्यालय कोणत्या वर्गवारीमध्ये येतात याची छाननी संचलनालयाला करावी लागते.

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत ...

सुरू होती. कंपनीने दिवाळखोरी जाहीर केली होती. या कंपनीच्या माध्यमातून मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप होता. याआधीही या कंपनी प्रकरणी राज ठाकरे यांनाही नोटीस पाठवण्यात आली होती. आर्थिक व्यवहारात अनियमितता होती. यात मनी लाँड्रिंग झालं आणि पोलिसांनी यात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी अरुणकुमार साहा यांना ताब्यात घेऊन चौकशी केली होती. यामध्ये अनेक नावे समोर आली होती. त्यात जयंत पाटील यांच्याही नावाचा समावेश आहे. ईडीने नोटीस पाठवल्याच्या वृत्तावर जयंत पाटील यांनी मात्र अद्याप अशी कोणती नोटी मिळाली नसल्याचं म्हटलं आहे.

## गोड साखरेला महागाईची

दशलक्ष टन साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे. त्यांनी पुढे म्हटले की, त्याशिवाय, इथेनॉल उत्पादनासाठी सुमारे ४५ लाख टन साखरेची मळी वापरला जाण्याचा अंदाज आहे. उसाच्या रसापासुन साखर बनवितांना मळी (मोलॅसिस) तयार होते. त्या मळीवर प्रक्रिया करून इथेनॉल तयार होते.

एनएफसीएसएफने सांगितले की, त्याचा अंदाज ऊस आणि साखर उत्पादनावर नुकत्याच हाती असलेल्या माहितीवर आधारित आहे.साखरेचे उत्पादन कमी झाल्याचा परिणाम त्याच्या दरावरही दिसून येत आहे. गेल्या महिनाभरात साखरेच्या दरात १.५० रुपयांची वाढ झाली आहे. महिनाभरापूर्वी ४१ रुपये किलोने मिळणारी साखर आता ४२.५० रुपये किलोने उपलब्ध आहे. घाऊक बाजारातही साखरेच्या दरात वाढ झाली आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

मान्यवरांच्या हस्ते भारती विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन करण्यात आलं आहे.

जबाबदारी महत्त्वाची : यावेळी नार्वेकर यांना त्यांची भूमिका ही खूप महत्त्वाची असणार आहे, याबाबत विचारले असता ते म्हणाले की, अध्यक्ष म्हणून माझी जबाबदारी ही उद्यापासून महत्त्वाची नाही.

तर, ज्या दिवशी मी अध्यक्ष म्हणून विराजमान झालो आहे. तेव्हापासून मी जबाबदारीने काम करत आहे. तसेच मी कायमच विदेशात जात नाही, केवळ ३ दिवसांसाठी जात आहे. त्याचा इथे काही परिणाम होणार नाही. सर्व कामकाज व्यवस्थित सुरू राहील असे यावेळी नार्वेकर म्हणाले.

## रायगडावरील २ जूनच्या ..

जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी, सर्व प्रमुख विभागाचे अधिकारी असावेत. समिती तयार केल्यानंतर समितीची उपसमिती तयार करुन जबाबदाऱ्या निश्चित करण्यात याव्यात. कामाचे योग्य पद्धतीने वाटप करुन पूर्ण कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे, अशा सूचनादेखील त्यांनी दिल्या.

हवामान खात्याच्या माध्यमातून ०१ ते ०७ जूनपर्यंत हवामानाबद्दल माहिती घेऊन तसे नियोजन व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आवश्यक असल्यास गडावर बॅटरी ऑपरेटेड वाहने, समाधीची उत्कृष्ठ सजावट, आरोग्यविषयक सर्व सोयी-सुविधा व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता योग्य प्रमाणात करावी, अशा सूचना दिल्या.

प्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई यांनी हा सोहळा कसा असेल याचे सादरीकरण केले. राज्याभिषेक करण्यासाठी १००८ जल कलश पूजनाचे आणि रथाचे नियोजन या बाबत देखील बैठकीत चर्चा झाली.

# राज्यातील दोन बंदरांना 'सागर श्रेष्ठ सन्मान' पुरस्कार प्रदान



नवी दिल्ली/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील मुंबई बंदर प्राधिकरण व जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण या दोन बंदरांनी वर्ष २०२२-२३ मध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज 'सागर श्रेष्ठ सन्मान' पुरस्काराने सन्मानित केले.

येथील इंडिया इंटरनेशनल केंद्रामध्ये केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्यावतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात 'हरित सागर' ग्रीन पोर्ट मार्गदर्शक तत्त्वाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच 'सागर श्रेष्ठ सन्मान' पुरस्काराने देशभरातील १२ बंदरांना सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल, विभागाचे सचिव सुधांश पंत, मुंबई बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष राजीव जलोटा व अन्य वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात देशभरातील प्रमुख बंदरांना आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीत निवडक विविध परिचालन मापदंडांच्या (ऑपरेशनल पॅरामीटर्स) आणि त्यांच्या अपवादात्मक कामगिरीबद्दल तसेच सर्वाधिक वाढीव सुधारणा नोंदविलेल्या बंदरांना सन्मानित करण्यात आले.

वर्ष २०२२-२३ मधील त्यांच्या एकूण कामगिरीच्या आधारावर त्यांना क्रमवारी देण्यात आली. प्रमुख बंदरांमध्ये निष्पक्ष आणि निरोगी स्पर्धा निर्माण करणे आणि येत्या वर्षात त्यांना अधिक चांगली कामगिरी करण्यास प्रोत्साहन देण्याची कल्पना या पुरस्कारामागची आहे. यामध्ये महाराष्ट्रात असणाऱ्या दोन बंदरांनीही उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल गौरविण्यात आले.

मुंबई बंदर प्राधिकरणाने वर्ष २०२२-२३ च्या एकूण कार्यप्रदर्शनात दुसरा क्रमांक पटकाविला आहे. प्राधिकरणाचे अध्यक्ष राजीव जलोटा यांनी हा पुरस्कार केंद्रीय मंत्री श्री सोनोवाल यांच्या हस्ते स्वीकारला. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाला वर्ष २०२२-२३ च्या टर्न-अराउंड-टाइम (नॉन-कंटेनर पोर्ट) मध्ये परफॉर्मन्स शील्ड मिळाली. तसेच वर्ष २०२२-२३ च्या एकूण वार्षिक कामगिरीनूसार ६ क्रमांक प्राप्त झाला. यासाठी स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय सेठी, आणि उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांच्यावतीने नितीन बोरवणकर, मुख्य व्यवस्थापक एमईसीएचएल इलेक्ट्रीकल इंजिनिअर एण्ड सीईओ एसईझेड यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# आधुनिक शेतीची कास धरल्यास विकास शक्य : डॉ.अरविंद डागा

## पश्चिम बंगालचे डॉ.अरविंद डागा यांची स्वेरीला सदिच्छा भेट





पंढरपूर/प्रतिनिधीः 'शेती उत्पन्नात अधिक सुधारणा करायची असेल तर शेतीत आधुनिक यंत्राचा वापर करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला पाहिजे. यातून शेतीसाठी लागणारी विविध अवजारे, ट्रॅक्टर, पेरणीयंत्र, रोटाव्हेटर, फण, पंजी, बीबीएफ यंत्र, नांगर अशा शेतीशी संबंधित यंत्रामुळे शेतीची कामे जलद गतीने व कमी खर्चात होतात. त्यातून शेतीच्या मशागतीची कामे हलकी होऊन शेतमजूरांवरील खर्च देखील वाचतो. इतकेच नव्हे तर शेतीसाठी घेतलेली महागडी यंत्रे ही इतर शेतकऱ्यांना भाडे तत्वावर देवून त्यातूनही उत्पन्न वाढू शकते. यातून शेतीला जोडधंदा देखील लाभतो म्हणून सध्या आधुनिक शेतीची कास धरल्यास शेतीचा पर्यायाने आपला विकास शक्य होणार आहे.' असे प्रतिपादन जागतिक बँकेचे पश्चिम बंगाल मधील सेवानिवृत्त अधिकारी डॉ.अरविंद डागा यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगला जागतिक बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी डॉ.अरविंद डागा यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. प्रारंभी सोबसचे गिरीश संपत यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी बोलताना डॉ.डागा म्हणाले की, 'भारत व भारतीय शेती यांबद्दल मला खूप आपुलकी असून भारतातील शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करून कमी प्रमाणात शेती क्षेत्र असलेल्या भागात जास्तीत जास्त उत्पन्न कमी कालावधीत कसे निर्माण करता येईल यावर अधिक भर द्यावा. सध्या माझे कार्य देखील याच दिशेने सुरु आहे. सध्या आपल्याकडे नवनवीन यंत्रांची निर्मिती होत असून पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड देऊन जास्तीत जास्त उत्पन्न कसे घेता येईल? याबाबत त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. या भेटी दरम्यान त्यांनी स्वेरीमधील विविध उपक्रमांची पाहणी करून सविस्तर माहिती जाणून घेतली. स्वेरीची ग्रामीण भागातील गरुडझेप पाहून त्यांनी येथील विविध उपक्रमांचे कौतुक केले. त्यानंतर त्यांनी पंढरपूरच्या लगत असलेल्या तावशी व खर्डी यासारख्या भागातील शेतकऱ्यांना व त्यांच्या शेतीला भेट देऊन पाहणी केली.

शेतीतील निघणारे उत्पादन हे जागतिक बाजारपेठेत लवकरात लवकर कसे पोहोचवता येईल आणि तेथून पुढे ते थेट ग्राहकापर्यंत कसे पोहोचेल, शेतातील मातीचे परीक्षण करून मातीचा दर्जा सुधारण्यासाठी कोण कोणत्या नवनवीन उपाययोजना कराव्या लागतील याबाबत त्यांनी ग्रामस्थांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी 'सोबस इन्साईटस् फोरम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी दिग्विजय चौधरी, स्वेरीचे युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डॉ. हर्षवर्धन रोंगे व इतर संशोधक प्राध्यापक वर्ग आदी उपस्थित होते.

# डोंबिवली बदलापूर स्वामीभक्त मंडळींची शतक महोत्सवी आध्यात्मिक उपासना

## महेश इंगळेंच्या सहकार्याने शतक महोत्सवी उपासनेकडे वाटचाल : सोमदत्त आसोलकर



अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थ दैवत माझे हा ध्यास उराशी बाळगून गेल्या शंभर महिन्यांपासून डोंबिवली बदलापूरकरांची धार्मिक कार्यक्रमांची मासिक सेवा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्वामी चरणी अर्पण होत आहे. या धार्मिक कार्यक्रमांच्या उपासनेचे यंदा शंभरावा महिना असून येत्या १३ व १४ मे रोजी वटवृक्ष मंदिरात डोंबिवली बदलापूरकरांच्या वतीने कीर्तन, नामस्मरण, नामजप, भक्तीसंगीत आदी विविध कार्यक्रमाच्या अविष्काराने शतक महोत्सवी पर्वसंपन्न होणार आहे. याप्रसंगी बोलताना डोंबिवली बदलापूरचे स्वामीभक्त सोमदत्त असोलकर यांनी देवस्थानचे तत्कालीन चेअरमन कै.बाळासाहेब इंगळे यांच्या प्रेरणेतून आम्ही स्वामी चरणी सेवा करण्यास आलो होतो. पुढे मंदिर समितीचे विद्यमान चेअरमन महेश इंगळे यांच्या अत्यंत मौलिक सहकार्याने ही सेवा वृध्दींगत होत गेली. कोरोनामुळे लॉकडाऊन काळातही ऑनलाइन भक्ती संगीत सेवा, कीर्तन सेवा, संपन्न झाले. तो काळ अत्यंत खडतर होता. सर्वांसाठीच परीक्षा घेणारा होता. आपल्यासारखे भक्तगण ऑनलाइनच्या माध्यमातून का होईना त्या काळात स्वामींचे स्मरण केल्याने या सर्व संकटातून आपण सुखरूप तारून निघालो. त्यानंतर मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या पुढाकाराने स्वामींनी पुन्हा येऊन मासिक सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली व देत आहेत. भावभक्ती मनातून असल्यास ही सेवा नक्कीच देवापर्यंत पोहोचते याची आपल्याला सार्थ प्रचिती येत आहे. त्याचे कारण म्हणजे आता येणाऱ्या शंभराव्या मासिक सेवेची आमची भक्ती स्वामींच्या चरणापर्यंत पोहोचलेली आहे याची आम्हाला जाणीव आहे. अशीच सेवा आजन्म घडत राहावी हीच स्वामी चरणी प्रार्थना असल्याचे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, अविनाश क्षीरसागर इत्यादी उपस्थित होते.

# खरीड गावात संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी



ठाणे/ मिलिंद जाधव : पंचशील मित्र मंडळ खरीड आयोजित तथागथ भगवान बुद्ध,सम्राट अशोक,छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले,छत्रपती शाहूमहाराज व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्या महानायकांच्या संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सामाजिक ,धार्मिक,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडी किनव्हली विभाग अध्यक्ष शंकर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

ह्या प्रसंगी विजय थोरात यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर संतोष भवार,शशिकांत जाधव व त्यांची संपूर्ण टीमने भीम गीतांचा कार्यक्रम सादर केला.यावेळी डोंबिवली नागरिक सहकारी बँक चे मॅनेजर दिलीप थोरात,भारतीय बौद्ध महासभा जगदीश थोरात,संविधान प्रतिष्ठाण संस्था अध्यक्ष प्रभाकर थोरात,एन. डी. एम.जे शहापूर तालुका अध्यक्ष गुरुनाथ कशिवले,भारतीय बौद्ध महासभा माजी अध्यक्ष भरत घनघाव,भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दल चे सैनिक जगदिश कशिवले, सामाजिक कार्यकर्ते राहुल भवार,राष्ट्रवादी युवा काँग्रेस पार्टी चे अनिल गगे,वंचित बहुजन आघाडी किनव्हली विभाग उपाध्यक्ष विकास वाढविदे,वंचित बहुजन आघाडी कार्यकर्ते व कवी दिलीप थोरात,वंचित बहुजन आघाडी शेणवा विभाग अध्यक्ष प्रवीण कांबळे,सवरोली शाखा उपाध्यक्ष जगदीश घायवट, विजय शिंदे,तसेच आम्ही आंबेडकरवादी सेन्ट्रल अध्यक्ष समीर थोरात,महेश फोडसे,गावचे पोलीस पाटील संजय गगे उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी आयोजक सारनाथ रोकडे ,सागर रोकडे यांनी मेहनत घेतली.तर जगदीश रोकडे,आकाश रोकडे,समीर रोकडे,मधुकर रोकडे,मिलिंद रोकडे,दीप रोकडे,रोहित रोकडे,रामदास रोकडे,नामदेव रोकडे,कैलास उबाळे,सचिन जाधव,सुधीर वरघट, सुनील वरघट,मदन उबाळे,दीपा जाधव,अर्चना घनघाव,दीपाली रोकडे,पूजा रोकडे,अंजना रोकडे,वंदना रोकडे,गीता रोकडे,ममता वरघट,निशा वरघड यांचे सहकार्य लाभले..सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय बौद्ध महासभा बौद्धचार्य, अंधश्रद्धा निर्मूलन शहापूर विभाग सदस्य,संभाजी ब्रिगेड प्रवक्ते,कवी ,लेखक संघरत्न घनघाव यांनी केले.

# उस्मानाबादेत ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन




कळंब/सुधाकर रणदिवे : उस्मानाबाद येथे आज श्रद्धेय, मा. ड.बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त गाझी शमशोद्दीन दर्गा उस्मानाबाद येथे चादर चडवुन साहेबांच्या दिर्घायुष्यासाठी दुवा आदा केली याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे मा.प्रवीण दादा रणबागुल मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष मा.रमेश गायकवाड विभागीय सचिव तथा उस्मानाबाद प्रभारी मा.भैय्यासाहेब नागटिळे मराठवाडा का.स तथा जिल्हा उपाध्यक्ष,मा.बि.डी.शिंदे वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष,मा.विकास बनसोडे वंचित बहुजन आघाडी मा.प्रवक्ता उस्मानाबाद मा.कुंदन वाघमारे प्रसिध्दी प्रमुख,मा.के.टी गायकवाड जिल्हा प्रवक्ते ,मा. नामदेव वाघमारे आखिल भारतीय जिवा सेना जिल्हाध्यक्ष,मा.मुकुंद लगाडे,मा.शितल चव्हाण जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन युवक आघाडी,मा.वैभव गायकवाड जिल्हा उपाध्यक्ष,व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मे महिन्याच्या सुट्टीतील पारंपारिक खेळ हरवले फक्त क्रिकेट व मोबाईल प्रसिद्ध झाले

कोल्हापूर/नामदेव निर्मळे :मे महिन्याच्या सुट्टीतील पारंपारिक खेळ हरवले.बघता बघता लहान मुलांचा आवडता मे महिना चालू होऊन १० दिवस झाले. पण बदलत्या जीवनशैलीमुळे व मोबाईल, टि.व्ही.च्या अतिरेकी वापरामुळे सुट्टीचा मनमुराद आनंद मात्र मुलं घेताना दिसत नाहीत.

सुट्ट्या लागून इतके दिवस झाले तरी अजूनही गल्ली बोळ शांतच दिसत आहेत. कारण आजच्या मुलांना आपले पारंपारिक खेळ माहीतच नाहीत. किंवा टीव्ही, मोबाईलच्या नादात त्यांना ते खेळण्याची इच्छा होत नाही. असे म्हणले तरी वावगं ठरणार नाही. मुलं सुट्टीच्या दिवसात इलेक्ट्रिक उपकरणांच्या आणखीन आहारी जाऊ नयेत. यासाठी पालकांना आपल्या मुलांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. क्रिकेट खेळावरच मुलांचा जास्त प्रभाव दिसून येत आहे. मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन देणे. गरजेचे असून मुलांना आपल्या पारंपारिक खेळांची पालकांनी ओळख करून दिली पाहिजे. व पारंपरिक खेळ हे निरंतर राहण्यासाठी पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. पारंपरिक खेळ सुद्धा निरंतर टिकून राहावे.

# जादूटोणा विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करा : प्र.जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे




सोलापूर/प्रतिनिधी : जादूटोणा, अघोरी प्रथा या समाजासाठी घातक असून राज्यात असले प्रकार वाढता कामा नये यासाठी अस्तित्वात असलेल्या जादूटोणाविरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.तसेच जादुटोणा विरोधी कायदाबाबत जनसामान्यांना विविध माध्यमातून माहिती देण्यासाठी अधिक जनजागृतीबाबत मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात यावे, अशा सूचना प्र. जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिल्या. जादूटोणाविरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी समाज कल्याणचे सहा. आयुक्त नागनाथ चौगुले, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, पोलीस निरिक्षक सुहास जगताप, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


राज्यात जादूटोणा, अनिष्ट व अघोरी प्रथा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. तसेच या कायद्याची जनजागृती मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे असून, जादूटोणा विरोधी कायद्याच्या प्रचार व प्रसारा सोबतच कायद्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. अनिष्ट प्रथा परंपरा व जादूटोणा समाजाच्या प्रगतीत मोठा अडथळा निर्माण करतात. यासाठी समाजाने सुद्धा प्रत्येक घटनेकडे जागृक नागरिक म्हणून पहावे असेही प्र. जिल्हाधिकारी ठोंबरे यांनी सांगितले. तसेच जादुटोणा विरोधी कायद्याचा प्रसार करण्यासाठी नेमलेल्या समितीत विभागीय समन्वयक म्हणून अशासकीय सदस्यांची नियुक्तीचे प्रस्ताव लवकरात लकवर पाठविण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. जादूटोणा विरोधी कायदा बैठकीनंतर जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक घेण्यात आली या सभेत अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत घडलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेण्यात आला. तसेच जिल्ह्यात ट्रॉसिटीचे घडलेले गुन्हे याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यातबाबत सूचना करण्यात आल्या.

# जालना ही २९ वी महापालिका म्हणून घोषित

जालना : जालना नगरपालिकेचे रुपांतर आता महापालिकेत होणार असून तशी घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे जालना आता राज्यातील २९ वी महापालिका घोषित करण्यात आली असून, सरकारने तसे आदेश काढले आहेत. याबाबत नगरविकास विभागाच्या उपसचिवांनी अधिसूचना जारी केली आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांपासून जालना नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत करण्यासंदर्भात राजकीय हालचाली सुरू होत्या. यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रस्ताव मागवण्यात आला होता. त्यामुळे हा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता. यासाठी सूचना आणि हरकती देखील मागवण्यात आल्या होत्या. त्यानंतर अखेर सरकारने जालना नगरपालिकेचे रुपांतर आता महापालिकेत करण्याचे आदेश काढले आहे.

राज्य शासनाच्या वतीने जालना महानगरपालिकेची घोषणा करण्यात आली आहे. जालन्याची स्टील इंडस्ट्रीज म्हणून ओळख आहे. तर मोसंबी उत्पादक जिल्हा म्हणून देखील जालना शहराची राज्यभरात ओळख आहे. त्यात वाढती लोकसंख्या पाहता आणि शहराच्या विकासाच्या दृष्टीने जालना महानगरपालिका घोषित करावी यासाठी अनेक वर्षे मागणी सुरू होती.

## शब्दकोडे क्र १३०



आडवे शब्द १. नसता संबंध जोडणे (वाक्य प्रचार) ७. हिंमत, धैर्य १०. मालाची विक्री ११. नवविवाहितेच्या गळ्यातील एक दागिना १२. उपस्थित १४. अभिनय म्हणजे जणू ---- प्रवेश! १७. वर्ष, साल १८. तुझे (कवितेत) १९. रक्षाबंधन २०. मरेपर्यंत २२. लिंबू-पाणी २३. आकाराची उभी रेघ २४. धाक २६. कवडीमोल २८. क्रिकेटमधील धाव ३०. समोरासमोरची चकमक ३२. श्वसनेंद्रिय ३३. रुग्णालय ३५. वर-वधूची मिरवणूक ३७. पैसा आणि बळ यांचा खेळ! ३८. बोजा, वजन ३९. टप्पा, अंतर ४०. विजांचा आवाज ४१. श्रीकृष्णाचे वडील व आई ४३. देव ४४. स्वीकारलेले अवघड काम ४७. देशी 'फ्रीज'! ४८. कागदाचे मोजमाप ५१. तपासनीस (इंग्रजी) ५२. नवीन, न वापरलेली ५५. रामदासस्वामींचा जन्मदिन ५७. एखादे काम करण्यास समर्थ असलेला, क्षमता असलेला ५९. पांढऱ्या टोपीचे गवत ६१. जागृती ६२. शिक्का ६४. श्रीमंत ६७. कैद ६९. लहानच्या विरुद्ध ७०. नासधूस, नासाडी ७३. नरम स्वभावाचा ७४. घराचे धाबे, माळा ७६. चानी ७७. सान ७८. भूकंप ७९. अंत:करण

उभे शब्द १. वस्ती २. हत्तीची ललकारी ३. चकचकीत ४. पाणी साठविण्याचे पात्र (इंग्रजी) ५. आवडता, प्रिय ६. रंग ७. द्रव्य, संपत्ती ८. माझे ९. भरपूर चोप देणे (वाक्य प्रचार) ११. कन्या, मुलगी १३. एक गळीत धान्य १४. दुर्दशा १५. नाद, स्वर, आवाज १६. वेदना १७. याशिवाय उद्धार नाही! १९. वहिवाट, जाणे-येणे २१. दालचिनी २३. पाण्याचा पाट २५. व्रत, नेम २६. मर्कट २७. 'आनंददायी' मिष्टान्न २९. नवरामुलगा ३१. भ्रमर, भुंगा ३२. न आवडणाऱ्या व्यक्तीचे गुणही दोष वाटतात याअर्थी वाक्यप्रचार ३४. जनगणना ३६. लाल व निळा यांच्या मिश्रणातून तयार होणारा रंग ३७. सकसच्या विरुद्ध ३८. किंमत ४२. फळ-पान यांना झाडाशी जोडणारा भाग ४३. सुख देणारी ४५. धनादेश (इंग्रजी) ४६. उत्तराधिकारी ४९. सहाय्यक ५०. आपले राष्ट्रगीत ५२. नाजूक ५३. प्रत्येक दिवशी ५४. फाल्गुनातील पंचमीचे विशेषण ५६. शिक्षा ५८. माफी ५९. थंडी ६०. मजेने रेंगाळत, --- गमत ६३. आंब्याची पोळी ६५. श्रीकृष्णाचे एक नाव ६६. प्रवेश करणे ६८. हद्द (करणे) ७१. जिवलग ७२. मऊ ७५. खून, हत्या

# पदोन्नती ही माझ्यावरील स्वामीकृपाच : उपजिल्हाधिकारी अंजली मरोड

अक्कलकोट/प्रतिनिधी : स्वामी समर्थांचे आशीर्वाद माझ्या कुटुंबीयांवर नेहमीच आहेत. स्वामी कृपेने अक्कलकोटला स्वामींच्या पावनभूमीत तहसीलदार पदावरून प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून जनसेवा करण्याची संधी लाभली. अक्कलकोटला असल्याने स्वामींच्या मठात नेहमीच येणे जाणे असायचे, त्यामुळे कामाच्या माध्यमातून का होईना स्वामी दर्शनाकरिता बोलून घेत असतात याचा विशेष आनंद होता.स्वामीकृपा असल्याने जास्त लांब न जाता सोलापूरलाच इतके दिवस प्रशासकीय माध्यमातून विविध पदावरून काम करण्याची संधी मिळाली. आता स्वामी कृपेनेच पदोन्नती होऊन उपजिल्हाधिकारी पदी काम करण्याची संधी लाभल्याने आनंदच आहे. या माध्यमातून बढतीने मिळालेली पदोन्नती ही माझ्यावरील स्वामी कृपाच असल्याचे मनोगत उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनी व्यक्त केले. ते नुकतेच उपजिल्हाधिकारी पदी बढती मिळाल्यानंतर प्रथमच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी अंजली मरोड व त्यांच्या भगिनींचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. यावेळी बोलताना मरोड यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, संजय पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.



# महा-डीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा २४ तास उपलब्ध

## समाजमाध्यमातील अफवांवर विश्वास न ठेवण्याचे कृषि विभागाचे आवाहन

पुणे : महा-डीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांना अर्ज करण्याची सुविधा २४ तास उपलब्ध असून समाजमाध्यमातून पसरविण्यात येणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज भरण्याची व सोडतीची मुदत १५ मेपर्यंत असल्याचे तसेच १५ मे नंतर जवळपास २ ते ३ महिने ऑनलाइन शेतकरी निवड सोडत होणार नाही, अशा आशयाचे संदेश आणि माहिती अज्ञातामार्फत विविध सामाज माध्यमांवर पसरविण्यात येत आहे.

महाडीबीटी पोर्टल संदर्भात अशाप्रकारचा कोणताही संदेश आणि माहिती कृषि विभागामार्फत देण्यात आलेली नाही,

या संगणकीय ऑनलाईन प्रणालीवर शेतकऱ्यांना अर्ज करण्याची सुविधा २४ तास उपलब्ध असून अर्ज केलेल्या घटकांची सोडत शेतकऱ्यांनी केलेल्या अर्जानुसार व आवश्यकतेनुसार दर आठवड्याला काढण्यात येत आहे, असे कृषि विभागाने कळवले आहे.

शेतकऱ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर शेतकरी योजना या सदराखाली जाऊन विविध लाभाच्या घटकांसाठी अर्ज करावेत, असेही आवाहन कृषि विभागाकडून करण्यात आले आहे.

# सोलापूर जिल्हा हा काँग्रेस पक्षाचा विचाराचा जिल्हा आहे आपण एक विचाराने काम करू या : प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले




सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हात काँग्रेसची विचार धार मोठ्या प्रमाणात आहे. आपण सर्वजण एक दिलाने एक विचाराने काम केल्यास पुन्हा काँग्रेस पक्षास गतवैभव प्राप्त होणार आहे. मी म्हणजे पक्ष नसून पक्ष म्हणजे मी आहे. अशी भावना प्रत्येकामध्ये असली पाहिजे देशाचे नेते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे साहेब हे आपले सर्वांचे नेते आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे कामकाज चालणार आहे. असे मत आज सोमवार दिनांक ८ मे २०२३ रोजी कैकाडी महाराज मठ पंढरपूर. येथे सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीने आयोजित केलेल्या काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्यात मार्गदर्शन करताना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी केले.

या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले होते.

मेळाव्याचे स्वागत व प्रास्ताविक तालुकाध्यक्ष हणमंतराव मोरे व शहराध्यक्षअमर सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून भारताच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिराजी गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

यावेळी पुढे बोलताना नानाभाऊ पटोले म्हणाले. जे कार्यकर्ते सर्वसामान्य जनतेमध्ये जाऊन काम करतील त्यांनाच पुढे पक्षांमध्ये संधी मिळेल. गट -तट निर्माण न करता एक विचाराने सर्वांनी काम करावे जनता काँग्रेस पक्षाकडे आशेने पहात आहे. आपण जनतेमध्ये जाऊन त्यांचा विश्वास संपादन करावा असे आवहान प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी केले.

यावेळी जिल्ह्यातील सुलेमान तांबोळी( मोहोळ) ,अभिषेक कांबळे (सांगोला) ,प्रशांत साळे (मंगळवेढा) ,ऋषिकेश बोबडे (माढा ) शालिवान माने- देशमुख (उत्तर सोलापूर), अण्णासाहेब इनामदार (माळशिरस),कु.शितलताई म्हेत्रे (अक्कलकोट), नितीन चोपडे (करमाळा), सतीश पाचकवडे (बार्शी)आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते -पाटील ,शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष रामहरी रुपनवर ,प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस विश्वनाथ चाकोते, प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते मनोज कुलकर्णी, वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, दादासाहेब साठे, उपाध्यक्ष अर्जुनराव पाटील, देवानंद गुंड पाटील, पश्चिम महाराष्ट्र किसान सेलचे अध्यक्ष प्रा. संदीप साठे, माजी सभापती बाबासाहेब शिरसागर ,महिला काँग्रेस कमिटीचे अध्यक्षा शाहीनताई शेख, शहर महिला काँग्रेस कमिटीचे अध्यक्षा हेमाताई चिंचोळकर ,अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष वसीमभाई पठाण, निराधार निराश्रीतचे अध्यक्ष सुरेश हावळे, संस्कृतीक सेलचे अध्यक्षा कविताताई कदम, किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संग्राम चव्हाण, तालुकाध्यक्ष हनुमंतराव मोरे, शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी, राहुल पाटील, किशोर जाधव, दिलीप जाधव, उपाध्यक्ष राधाकृष्ण पाटील, दत्ता गाढवे, दिलीप जाधव ,आदी उपस्थित होते.

यावेळी संपूर्ण देशामध्ये मा. खा. राहुलजी गांधी यांनी केलेल्या कन्याकुमारी ते काश्मीर पर्यंतच्या यात्रेचे महाराष्ट्रात सर्वात उत्कृष्ट असे नियोजन केल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्याध्यक्षा आ.प्रणितीताई शिंदे, प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष रामहरी रुपनवर, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते- पाटील यांचा अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.हा ठराव

सोलापूर जिल्हा काँग्रेसचे प्रसिद्धीप्रमुख सातलिंग शटगार यांनी मांडला.

याप्रसंगी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कमिटीचे अध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते- पाटील आपल्या मार्गदर्शन म्हणाले. पुढील काळात ग्रामीण भागामध्ये संघटना बांधणी करून गण, गट मध्ये पदाधिकारी निवड करून घरोघरी काँग्रेस पक्षाचा हात हा कार्यक्रम राबविणार असल्याचे म्हणाले.

माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे आपल्या मार्गदर्शन म्हणाले. तालुकाध्यक्ष व जिल्हा पदाधिकारी यांनी प्रत्येक गावात जाऊन काँग्रेस पक्षाने केलेल्या कामाची माहिती घरोघरी द्यावी. प्रत्येकाने हे काम प्रामाणिकपणे करावे तरच काँग्रेस पक्षाला गतवैभव मिळणार आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष रामहरी रुपनवर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी गट- तट न मानता जुन्या व नव्याचा मेळ घालून सर्वांना बरोबर घेऊन पक्षाचे काम करावे. काँग्रेस पक्षाने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. हे मिळवलेले स्वातंत्र्य काँग्रेस पक्ष टिकविणार आहे. यामुळे आपण जोमाने कामाला लागावे असे म्हणाले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.मल्लिकार्जुन खरगे आणि त्यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या कर्नाटक

चितापूर येथील भाजपाचे उमेदवार मणिकांत राठोड यांच्या विरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी गुन्हा दाखल केला. त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील व शहरातील पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश ओबीसी विभागाचे उपाध्यक्ष सुधीर लांडे, सरचिटणीस भीमराव बाळगे, संघटक रमेश हसापुरे, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, तालुकाध्यक्ष हरीश पाटील, गजेंद्र खरात, राजेंद्र रुपनवर ,विष्णू आप्पा शिंदे, बजरंग बागल, अण्णासाहेब शिंदे,संजय चौगुले, गिरीश शेटे सुरेश शिवपूजे, सौदागर जाधव, राजेश भादुले, सुनील भोरे, हरिभाऊ पाटील, अमोल म्हमाणे, अशोक देवकते ,किशोर पवार, जहीर मणेर, सरचिटणीस सुदर्शन आवताडे, भीमराव वसेकर, सतीश पालकर, नवनाथ साठे, मुन्ना हरणमारे, शांतिनाथ बागल, दीपक खोचरे -पाटील, सेवादलाचे गणेश माने, रामभाऊ वाघमारे, फिरोज शेख, अश्फाक सय्यद, बाळासाहेब मगर, रवींद्र कांबळे, जयश्री कवचाळे,अरुणा बेंजारपे, कांतीलाल राऊत, संग्राम जाधव, श्रीशैल रणखांबे ,सचिन खैरे- पाटील, मोहम्मद शेख, रमजान नदाफ, भारत मगर,सचिन गुंड, गोविंदराव पंके, संजय पाटील,समाधान रोकडे, शहर अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष तौफिकभाई हत्तूरे, शहर मध्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष वाहिद विजापूरे, शहर मीडिया प्रमुख तिरुपती परकीपडला, नागनाथ अधटराव , अश्फाक सय्यद,राजश्री लोलगे ,मिलिंद आढवळकर, मामा फलटणकर, रफिक शेख, अक्षय शेळके,सुनिता अवघडे, मोतीलाल सुतार, कृष्णदेव वाघमोडे, संजय खरटमल, धनराज जमादार, लक्ष्मण बनसोडे सर, अमृता अष्टेकर, रेवणसिद्ध नागरे -पाटील, दाजी कोकाटे, आधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सातलिंग शटगार यांनी केले. व आभार जिल्हा सरचिटणीस किशोर जाधव यांनी मानले.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने निजपा गायकवाड यांचे वाढदिवस साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः भाजपा अनुसूचित जाती जमाती तालुकाध्यक्ष निजपा गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट व सिद्धार्थ सोशल फाउंडेशन यांच्यावतीने तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी बोलताना कमलाकर सोनकाबळे म्हणाले की राजकीय क्षेत्रात काम करत असताना निजप्पा गायकवाड यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून अनेक गरजू वंचित लोकांना न्याय देण्याचे काम करत आहे तसेच सिद्धार्थ सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक गरजू गरीब लोकांना विविध कामात सतत मदत करत असतात मागासवर्गीय वस्तीमध्ये विविध गावात विकास कामासाठी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी व आमदार कपिल पाटील यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी आणून अक्कलकोट तालुक्यातील मागासवर्गीय वस्ती सुधारण्यासाठी प्रयत्न करीत आहे यावेळी मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश जगताप, तालुका सचिव विश्वनाथ चव्हाण, कार्याध्यक्ष गौतम बाळशंकर, सल्लागार महेश गायकवाड, किरनळी गावचे सरपंच सतीश कणमुसे, मकबुल कणमुसे, अस्लम मुल्ला, ग्रामपंचायत सदस्य श्याम सोनकांबळे, दत्ता शिदोरे यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# गोरगरिबांना चादर व भोजन वाटप करून अक्कलकोट येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रकाश आंबेडकर यांचे वाढदिवस साजरा

अक्कलकोट/प्रतिनिधीः वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गोरगरिबांना चादर वाटप आणि भोजन वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. अक्कलकोट वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या मार्गर्शनाखाली प्रथमतः मुस्लिम कार्यकर्त्यांच्या वतीने शेख नुरुद्दिन बाबा दर्गा येथे बाळासाहेब आंबेडकर यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आला, त्यानंतर अक्कलकोट तालुका नूतन पदाधिकारी किशोर काळे, संतोष बाळशंकर, बसवेश्वर अंबुलगे यांचा सत्कार या शुभ दिनी करण्यात आला, याप्रसंगी प्रा. सागर सोनकांबळे, शिक्षक विनोद थोरे सर, शिव बसव डॉ आंबेडकर सामजिक संस्थाचे अध्यक्ष संदीप मडीखांबे या मान्यवरांचे अतिशय सुंदर मनोगत आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या बदल व्यक्त करण्यात आला. कार्यकर्त्यांनी आणलेला पाच किलोचा केक सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या हस्ते कापण्यात आला आणि शेवटच्या टप्प्यात सर्व मान्यवर, उपस्थित पदाधिकारी, व कार्यकर्ते हितचिंतक यांच्या हस्ते गोरगरिबांना चादर वाटप करुन आणि भोजन वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आला.

या प्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष शीलामणी बनसोडे, जिल्हा संघटक मल्लिनाथ पाटील, शहर अध्यक्ष विशाल ठोंबरे, शहर महासचिव भारत देडे, सचिन मोरे, चनु शिंगे, शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले, संघटक दुष्यंत देडे युवक आघाडी तालुका अध्यक्ष प्रकाश शिंदे , महासचिव दत्ता बाळशंकर ,उपाध्यक्ष संकेत शीरसे, सुनिल शिंगे, गंगाराम गायकवाड, संघटक योगेश सोनकांबळे ,प्रसिद्धी प्रमुख आनंद सोनकांबळे, उपाध्यक्ष रोहित गायकवाड, सनी गायकवाड,

युवक आघाडी शहर अध्यक्ष संदीप बाळशंकर, महासचिव डॉ मणियार, रोहित साळे , उपाध्यक्ष राम बाळशंकर,

तालुका महासचिव नागेश हरवाळकर ,तालुका उपाध्यक्ष अमृत सोनकांबळे ,नरसिंह गायकवाड, तालुका संघटक आनंद मोरे ,श्याम बनसोडे उपाध्यक्ष महादेव थोरे चपळगाव शाखाध्यक्ष माणिक गायकवाड, वागदरी शाखाध्यक्ष उमेश बनसोडे ,उपाध्यक्ष राहुल भटारे इब्रामपूर शाखाध्यक्ष लालसिंग बनसोडे ,उपाध्यक्ष भावी कट्टी ,संघटक गौतम , बंटी नडगम, भुरीकवठेचे स्वामीराव बनसोडे, सामुदायिक विवाह सोहळा चे अध्यक्ष विकास गायकवाड यांच्या सह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे तालुका अध्यक्ष रवी पोटे यांनी केले तर आभार तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी केले



# जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन प्रकाशनासाठी १५ मे पर्यंत माहिती सादर करावी : हणमंत माळी

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हयाचे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२३ चे प्रकाशन वेळेत प्रकाशित होण्याकरिता संबंधित सर्व कार्यालयांनी १५ मे पर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आवाहन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे सहसंचालक हणमंत माळी यांनी केले आहे.

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२३ बाबत कार्यान्वयन यंत्रणांची आढावा बैठक जिल्हा नियोजन भवन येथे घेण्यात आली. बैठकीस नियोजनचे उपआयुक्त संजय कोलगणे, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा व सांख्यिकी विभागाचे उपसंचालक दिनकर बंडगर तसेच संबधित विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलीक गोडसे उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन शासकीय आकडेवारीचा मुख्यस्त्रोत आहे. यामध्ये विविध कार्यालयांची विकासात्मक आकडेवारी प्रकाशित केली जाते. जिल्हा स्तरावरील सामाजिक व आर्थिक निर्देशांकांबाबतची तालुकानिहाय माहिती यात दर्शविण्यात येते. विविध योजनांसाठी तसेच शासकीय, निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, संशोधक विदयार्थी आदींना या माहितीचा उपयोग होतो. यावेळी जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२३ या प्रकाशनाचे स्वरुप, महत्व, त्याची उपयुक्तता याबाबतही विस्तृत माहिती सहसंचालक हणमंत माळी यांनी दिली.प्रत्येक जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व त्यातूनच संपुर्ण महाराष्ट्र राज्याचा विकास करण्यासाठी जिल्हा विकास आराखडा तयार करावयाचा आहे. तरी या नवीन विषयाची सर्व संबधित यंत्रणांना ओळख करुन देणे, शासनाच्या सुचना, आपेक्षा, भविष्यात करावयाच्या कार्यवाहीची दिशा ठरविणे आदींची माहिती देण्याकरीता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शासन निर्णयानुसार प्रत्येक जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जिल्हास्तरावर, राज्यस्तरावर विविध समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

